# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट ३५३- २३** **दिनांक : - १३/१०/२०२३**

## “सप्टेंबर” महिन्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी / अंमलदार यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीत मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार.

आचोळे पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील फिर्यादी श्री दिपक मदनलाल शाह,वय ४५ वर्षे, धंदा मोटार ड्रायव्हीग स्कुल, रा. रुम नं. ई/१०६, ड्रीम एंजेल, फायरबिग्रेडजवळ, न्यु लिंक रोड, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जिल्हा पालघर यांनी दिनांक ३१/०८/२०२३ रोजी रात्री १०.०० वाजता ते दिनांक ०१/०९/२०२३ रोजी ०६.०० वाजताचे दरम्यान रो हाऊस नं.०१, नेमीनाथ नगर, आचोळे रोड, जया पॅलेस नालासोपारा पुर्व येथे सार्वजनिक रोडच्या कडेला उभी केलेली सिल्वर रंगाची वॅगनार कार क्रमांक एम.एच ४८ अे.डब्लु ९०१२ ही कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचे संमतीशिवाय लबाडीने चोरुन नेल्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन आचोळे पोलीस ठाण्यात गुन्हा रजि नं ४२३/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे हद्दिमध्ये सतत होणा-या वाहन चोरींचे प्रमाण वाढत असल्याने सदर वाहन चो-यांवर आळा घालणेबाबत मा. वरीष्ठांनी ओदशित केले होते. त्या अनुषंगाने घडणा-या प्रत्येक वाहन चोरीच्या गुन्हयाचे ठिकाणी प्रत्यक्ष भेट देवून घटनास्थळावरील सी सी टी व्ही फुटेजचे परीक्षण गुन्हे शाखा कक्ष -२ वसई यांचे मार्फतीने करण्यात येत होते. त्याप्रमाणे आचोळे पोलीस ठाणे ४२३/२०२३ भादविस कलम ३७९ प्रमाणे या वाहन चोरीच्या गुन्हयांतील चोरीस गेलेल्या व्हॅग्नार कारचे सी सी टी व्ही फुटेज माग काढत असताना सदरची व्हॅग्नार कार ही श्रीराम नगर, नालासोपारा पुर्व या ठिकाणी अपघातग्रस्त अवस्थेत सापडली. सदर अपघातग्रस्त वाहनाचे वाहन चालकाबाबत आजुबाजुस परीसरात तपास करता सदर आरोपीत ईसमास अपघातात कपाळास दुखापत झाल्याची माहीती प्राप्त झाली. जखमी आरोपीत हा उपचाराकरीता नमुद अपघाताचे परीसरात वैदयकिय उपचाराकरीता जाण्याची शक्यता जाणुन सदर ठिकाणचे रुग्णालयात तपास करता आरोपीत इसमाने साई हॉस्पिटल, धानीवबाग येथे दवाउपचार घेतल्याची माहीती प्राप्त करुन सापळा रचुन इसम नामे शादाब उर्फ बाबा उर्फ तावडे नौशाद शेख वय २३ वर्ष रा. रुम नं १५४, मेहबुबे रुबानी मशिदजवळ, भारतीय नगर, कुर्ला पश्चिम. सध्या रा. - गिता निवास चाळ रुम नं -६, हिराकुंज बिल्डींग जवळ, धानिवबाग नाका, वसई पुर्व यास ताब्यात घेण्यात आले.त्याचेकडे तपास केला असता त्याचा सदर गुन्हाचा सहभाग निष्पन्न झाल्याने वर नमुद गुन्हात त्यास अटक करण्यात आली असुन अटक आरोपीत याचेकडे अधिक तपास केला असता इकडील आयुक्तालयातील वाहन चोरीचे ११, घरफोडीचा १ , मोबाईल चोरीचा १ , इतर चोरीचा १ असे एकुण १४ गुन्हे व मुंबई पोलीस आयुक्तालयातील ३ गुन्हे उघडकीस आले आहेत.

**-: उघडकीस आलेले गुन्हे :-**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.रजी नं. व कलम |
|---|---|---|
| १. | आचोळे पोलीस ठाणे | ४२३/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे (मुळ गुन्हा ) |
| २. | पेल्हार पोलीस ठाणे | ७९४/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| ३. | पेल्हार पोलीस ठाणे | ८१८/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| ४. | पेल्हार पोलीस ठाणे | ८१९/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| ५. | पेल्हार पोलीस ठाणे | ८२०/२०२३ भा.द.वि.सं कलम ४५७, ३८० प्रमाणे |
| ६. | पेल्हार पोलीस ठाणे | ८३८/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| ७. | आचोळे पोलीस ठाणे | ३४०/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| ८. | आचोळे पोलीस ठाणे | ४०२/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| ९. | वालीव पोलीस ठाणे | ६६३/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| १०. | वालीव पोलीस ठाणे | ७३४/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| ११. | वालीव पोलीस ठाणे | ७४९/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| १२. | माणिकपुर पोलीस ठाणे | ३१९/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| १३. | वसई पोलीस ठाणे | ७४/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| १४. | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | ३०४/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| १५. | वडाला, मुंबई पोलीस ठार्णे | २४२/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| १६. | वनराई, मुंबई पोलीस ठार्णे | २०९/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| १७. | गोरेगाव, मुंबई पोलीस ठार्णे | ५६४/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |

अटक आरोपीत याचेकडुन उघडकीस आणलेल्या वाहन चोरी, घरफोडी आणि ईतर चोरीच्या एकुण १७ गुन्हयात १२ दुचाकी, २ चार चाकी, ४ मोबाईल व १ डुप्लीकेट चावी बनविण्याचा हँड व्हाईस व चाव्यांचा गुच्छा असा एकुण ५,९४,५००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

अटक आरोपी विरुध्द विनोबा भावे नगर पोलीस ठाणे, मुंबई येथे एकुण ०७ गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी करणारे गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, स.पो.नि. सुहास कांबळे, सागर शिंदे, स.फौ.संजय नवले, रमेश भोसले, पो.हवा. प्रफुल्ल पाटील, चंदन मोरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, रमेश आलदर, सुधीर नरळे, दादा आडके, पो.ना. प्रशांतकुमार ठाकुर, पो.अं. अमोल कोरे, सायबर शाखेचे स.फौ.संतोष चव्हाण, म.सु.ब. अविनाश चौधरी, रामेश्वर केकान यांचा दिनांक १३/१०/२०२३ रोजी मा. मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **"सप्टेंबर महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल" क्रमांक-१ म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.



मा.पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना पो.नि.श्री. शाहुराज रनवरे

२) दिनांक ०४/०९/२०२३ रोजी ०१.३० वा.ते ०२.०० वा.च्या दरम्यान संशयीत आरोपी नामे हैफल कालु अली वय-२७ वर्षे रा. शिवसेना गल्ली, भाईंदर पश्चिम, ता.जि. ठाणे याचेकडे मिरारोड पोलीस ठाणे गुन्हा रजी नं. ३१९/२०२३ भा.द.वी.स. कलम ३७९ या गुन्हयाच्या संदर्भात तपास करण्याचे आपले कर्तव्य बजावित असतांना संशयित आरोपीत यास का पकडले आहे ? या गोष्टीचा आरोपीत याने राग मनात धरुन पो.हवा.१००५० जयकुमार राठोड नेमणुक मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा मि.भा.व.वि.पो.आयुक्तालय यांना जिवे ठार मारण्याचे उद्देशाने लोखंडी रॉडने डोक्यात मारुन त्यांस गंभीर जखमी करुन त्यांचे खिश्यातील मोबाईल फोन व पैसे जबरीने खेचुन तेथुन पळुन गेला. म्हणुन त्याचे विरुध्द फिर्यादी पो.हवा. १२०१० अनिल रामदास नागरे नेमणुक मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा, मि.भा.व.वि.पो.आयुक्तालय यांनी दिले फिर्यादीवरुन मिरारोड पोलीस ठाण्यात गु.रजि.क्र ३२७/२०२३ भा.द.वि.स कलम ३०७,३९४,३५३,३३३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

वरील प्रमाणे दाखल गुन्हयांची गंभीरता लक्षात घेवुन मा. पोलीस आयुक्त श्री मधुकर पांडेय तसेच मा.अपर पोलीस आयुक्त श्री श्रीकांत पाठक यांनी गुन्हे शाखेतील सर्व युनीट व सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना वेगवेगळी पथके तयार करुन आरोपीताचा शोध घेणेबाबत आदेशीत केले.

मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे अविनाश अंबुरे, मा. सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे अमोल मांडवे यांचे आदेशाने गुन्हे शाखेच्या सर्व युनीटची अनेक पथके तयार करण्यात आली होती.

मा. वरीष्ठांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष-०१ चे अधिकारी व अंमलदार यांचे विषेश पथक तयार करुन त्यांना सदर गुन्हयांतील आरोपीत यांचा शोध घेण्यासाठी आदेशीत केले होते. सदर गुन्हयांतील आरोपीत नामे हैफुलअली कालुअली शेख वय-२५ सध्या फिरस्ता रा. शिवसेना गल्ली, भाईंदर पश्चिम, ता.जि. ठाणे. मुळ रा. कुतुबशहर, पोलीस ठाणे गाजौल, जिल्हा मालदा, राज्य पश्चिम बंगाल पिनकोड-७३२१०२ हा गुन्हा करुन पळुन जात असतांना त्याचे मार्गावरील मिळालेल्या सीसीटीव्ही फुटेज तांत्रीक विश्लेषन करीत असतांना आरोपीत हा त्याचे मुळ गावी जिल्हा मालदा, पश्चिम बंगाल येथे पळुन जात असतांना छत्रपती शिवाजी महाराज टर्मीनन्स, मुंबई येथे दि. ०४/०९/२०२३ रोजी २१.३० वा. मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेण्यात आले आहे.

सदरची कामगिरी करणारे गुन्हे शाखा कक्ष १ काशिमीरा युनिट१चे पो.नि. अविराज कुराडे, स.पो.नि. प्रशांत गांगुर्डे स.पो.निरी पुष्पराज सुर्वे, स.फौ.राजु तांबे, स.फौ संदीप शिंदे, पो.हवा.अविनाश गर्जे, संतोष लांडगे, पुष्पेंद्र थापा, विजय गायकवाड, सचिन हुले, सुधिर खोत, विकास राजपुत, पो.अं.प्रशांत विसपुते, तसेच स.फौ.संतोष चव्हाण, सायबर विभाग, तसेच म.सु.ब.चे किरण आसवल यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **“सप्टेंबर महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल” क्रमांक-२ म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.




मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना पो.नि श्री. अविराज कुराडे

३) पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दि. २०/०९/२०२३ रोजी ७.४५ वा. ते ९.२५ वाजताचे दरम्यान रुम नं ००४, बी विंग कोहिनुर बिल्डींग जामा मस्जीद जवळ, पेल्हार गाव, नालासोपारा पुर्व ता. वसई, जि. पालघर येथे फिर्यादी श्री. जैद नजीर शेरशिया वय- २३ वर्ष धंदा - नोकरी रा. रुम नं ००४, बी विंग कोहिनुर बिल्डींग जामा मस्जीद जवळ, पेल्हार गाव, नालासोपारा पुर्व ता. वसई, जि. पालघर यांच्या बंद घराच्या दरवाज्याची कडी कोयंडा कोणीतरी अज्ञात इसमाने कशाच्यातरी सहाय्याने तोडुन घरफोडी चोरी करुन फिर्यादी यांचे घरातुन १०,१५,०००/ रुपये रोख रक्कम चोरी करुन चोरुन नेल्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पेल्हार पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. I ८७१/२०२३ भा.द.वि. ३८०, ४५४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. वसंत लब्दे, यांनी सदर गुन्हयाचा तपास गुन्हेप्रकटीकरण पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक श्री. सोपान पाटील यांच्याकडे देऊन गुन्हेप्रकटीकरण पथकाचे अधिकारी अंमलदार यांचे वेगवेगळे ०५ पथके तयार करुन गुन्हयातील अज्ञात आरोपीत यांचा शोध घेऊन गुन्हा तात्काळ उघडकीस आणण्याबाबत आदेशित केले होते.

सदर आदेशान्वये गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी अमंलदार यांनी सदर गुन्हयाचे घटनास्थळाच्या परिसरातील सुमारे ६० वेगवेगळया ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासुन आरोपीत यास निष्पन्न करुन सदर आरोपीत यांच्या बाबत गुप्त बातमीदार यांच्याकडुन माहिती प्राप्त केली असता आरोपीत हा भिवंडी येथे असल्याबाबत माहिती प्राप्त झाल्याने आरोपीत यांचा भिवंडी, अंबाडी पारोळ, नालासोपारा फाटा, शानबार हॉटेल, धानिवबाग नालासोपारा पुर्व असा पाठलाग करुन आरोपीत चंद्रकांन्त रवि लोखंडे ऊर्फ चंदु, वय- २६ वर्ष, रा. जानकीपाडा, आंबेडकर नगर, मराठी शाळे जवळ, वालीव, वसई पुर्व, ता.वसई, जि.पालघर, यास शानबार हॉटेलच्या जवळ, धानिवबाग नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर येथुन ताब्यात घेऊन त्यांच्याकडे सदर गुन्हयाचे अनुषंघाने तपास केला असता त्याचा गुन्हयात प्रत्यक्ष सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास सदर गुन्हयाचे कामी अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचे तपासात आरोपीत यांच्याकडे कौशल्यपुर्वक तपास करुन त्यांने सदर गुन्हयात चोरी केलेल्या रोख रक्कमेपैकी ५,१२,७००/- रुपये रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. सदर गुन्हयामध्ये तपास अधिकारी यांनी अटक आरोपीत यांच्याकडे अधिक तपास केला असता आरोपीत यांच्याकडुन पेल्हार पोलीस ठाणे हद्दीतील एकुण ०८, वालीव पोलीस ठाणे हद्दीतील ०२, मांडवी पोलीस ठाणे हद्दीतील ०१ असे एकुण ११ घरफोडी चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

**उघडकीस आलेले गुन्हे**

| | |
|---|---|
| १ | पेल्हार पोस्टे गु.र.क्र. ८७१/२०२३ भादविस कलम ३८०,४५७ प्रमाणे. |
| २ | पेल्हार पोस्टे गु.र.क्र. ७७२/२०२३ भादविस कलम ३८०,४५७ प्रमाणे. |
| ३ | पेल्हार पोस्टे गु.र.क्र. ८७२/२०२३ भादविस कलम ३८०,४५४,४५७ प्रमाणे. |
| ४ | पेल्हार पोस्टे गु.र.क्र. ३८६/२०२३ भादविस कलम ३८० प्रमाणे. |
| ५ | पेल्हार पोस्टे गु.र.क्र. ३१३/२०२३ भादविस कलम ३८० प्रमाणे. |
| ६ | पेल्हार पोस्टे गु.र.क्र. ४२२/२०२३ भादविस कलम ४५७,४५४,३८० प्रमाणे. |
| ७ | पेल्हार पोस्टे गु.र.क्र. ४८९/२०२३ भादविस कलम ३७९ प्रमाणे. |
| ८ | पेल्हार पोस्टे गु.र.क्र. ५७५/२०२३ भादविस कलम ४५४, ३८० प्रमाणे. |
| ९ | वालीव पोलीस ठाणे गु.र.क्र. ७३०/२०२३ भादविस कलम ४५४, ३८० प्रमाणे. |
| १० | वालीव पोलीस ठाणे गु.र.क्र. ७४७/२०२३ भादविस कलम ४५४, ३८० प्रमाणे. |
| ११ | मांडवी पोलीस ठाणे गु.र.क्र. ८०/२०२३ भादविस कलम ४५४, ३८० प्रमाणे. |

अटक आरोपीत यांचेकडुन उघडकीस आलेल्या चोरी/घरफोडीच्या एकुण ११ गुन्हयामध्ये रोख रक्कम, सोने चांदीचे दागिने, व मोबाईल असे एकुण ८,९९,५५० रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. अटक आरोपीत हा सराईत गुन्हेगार असुन त्याच्या विरुध्द वालीव पोलीस ठाणे व तुळींज पोलीस ठाणे येथे यापुर्वी खालील प्रमाणे एकुण १० गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी करणारे श्री. वसंत लब्दे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. सोपान पाटील, सहा. पोलीस निरीक्षक, पोहवा. योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, पो.अं. रवि वानखेडे, संजय मासाळ, निखील मंडलिक, किरण आव्हाड, राहुल कर्पे, दिलदार शेख, अनिल साबळे, गोकुळ केंद्रे सर्व नेम. पेल्हार पोलीस ठाणे पोहवा. नामदेव ढोणे, पो.अं. सोहेल शेख, नेम. पोलीस उप आयुक्त कार्यालय परिमंडळ ०३ यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **“ सप्टेंबर महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल” क्रमांक -३ म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.

४) नायगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १२/०८/२०२३ रोजी दुपारी ०२.०० वाजता सुमारास खबर देणार नामे जेबा रामचंद्र महत वय-२२ वर्षे राहणार- रुम नं ३०१, जिवदानी निवास ओस्वालनगरी, विशालनगर, मस्जीद गल्ली नालासोपारा पुर्व यांनी खबर दिली की, खबर देणार यांची बहीण नामे नयना रामचंद्र महत वय-२८ वर्षे राहणार- सनटेक सोसायटी नायगाव पुर्व याठिकाणी राहत असुन तिचा दिनांक १४/०८/२०२३ रोजी पासुन फोन लागत नसल्याने तसेच तिच्या राहत्या पत्यावर जावुन पाहिले असता ती मिळुन न आल्याने तिच्या बाबत नातेवाईक, मित्र-मैत्रिण यांच्याकडे चौकशी केली असता काही एक उपयुक्त माहिती न मिळाल्याने ती मिसीग झाल्याबाबत दिनांक दिनांक १४/०८/२०२३ रोजी तक्रार दिल्याने मिसींग नं ४३/२०२३ दाखल करण्यात आली होती.

सदर मिसींग मुलगी ही मिळुन येत नसल्याने सदर मिसींग मुलीचे राहत असलेल्या बिल्डींगची सीसीटीव्ही फुटेज व गुप्तबातमीदार मार्फत मिळालेल्या माहिती आधारे संशयीत इसम नामे मनोहर शुक्ला राहणार- अस्टर. बिल्डींग ,एव्हरशाईन नालासोपारा पुर्व यास नालासोपारा पुर्व परिसरातुन ताब्यात घेवुन त्यांच्याकडे कौशल्यपुर्ण चौकशी केली असता त्यांनी सदर मिसींग मुलगी नयना रामचंद्र महत यांचा खुन केला असुन सदर मुलगीचे प्रेत हे पुरावा नष्ट करण्याकरिता आरोपीत व त्यांच्या पत्नी पुनम शुक्ला यांनी मिळुन गुजरात येथे टाकले असल्याबाबत कबुली दिल्याने सदरबाबत नायगाव पोलीस ठाणे गुन्हा रजि नं २९१/२०२३ भादविस कलम ३०२,२०१ प्रमाणे दाखल करण्यात आले असुन सदर गुन्हयामध्ये आरोपीत नामे मनोहर शुक्ला व महिला पुनम मनोहर शुक्ला यांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी करणारे नायगाव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रमेश भामे, गुन्हे प्रकटिकरण शाखेचे, स.पो.नि. गणेश केकान, स.पो.नि.रोशन देवरे,पो.हवा. देविदास पाटील, मुनाफ तडवी, सुनिल पाटील, नवनाथ तारडे, पो.अंम. सचिन मोहीते, सचिन खताळ, जयवंत खंडवी, अमर पवार, चेतन ठाकरे, अशोक पाटील यांचा **“ सप्टेंबर महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड ” क्रमांक-१ देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.




मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना स.पो.नि. श्री. देवरे

५) वालीव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २७.९.२०२३ रोजी १९:२० वाजताच्या सुमारास यातील फिर्यादी हे वालीव पुर्व येथुन वालीव बाजुकडे येणारे रोडने पायी चालत जात असतांना दोन अनोळखी इसमांनी त्यांचेकडील मोटारसायकल वरुन फिर्यादी यांचे पाठीमागुन येवुन फिर्यादीचे हातातील रु. १९०००/- किंमतीचा ओप्पो कंपनीचा मोबाईल जबरीने खेचुन चोरी करुन पळुन गेले म्हणुन वालीव पोलीस ठाणे गु.र.क्र. ७५१/२०२३ कलम ३९२,३४ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषगांने तांत्रीक विश्लेषणाचे आधारे तसेच गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे गुन्हयांचा तपास करुन आरोपी नामे १) मोहम्मद साहिल उर्फ चिरा जमाल अहमद चुरीहार, वय:१९ वर्षे, रा. मिल्लतनगर, वसई फाटा, वसई पुर्व, २) अल्फाझ ईलीयास अली शेख, वय : २४ वर्षे, रा.ठि. मिल्लतनगर, वसई फाटा, वसई पुर्व, ३) आकाश गोवींद रेडडी, वय २४ वर्ष, रा. इंदीरा वसाहत, वालीव, वसई पुर्व यांना अटक करुन वालीव पोलीस ठाणे गुन्हे शाखेतील अधिकारी व अंमलदार यांनी आरोपीत यांच्याकडे कौशल्याने तपास केला असता त्यांनी वालीव पोलीस ठाण्याचे व पेल्हार पोलीस ठाण्याचे अभिलेखावरील एकुण ९ गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. गुन्हयातील चोरीस गेलेले एकुण ८ मोबाईल व आरोपीत यांनी गुन्हयात वापरलेली मोटारसायकल असा एकुण रु. १ लाख ३२ हजार ५०० किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

**-उघडकीस आलेले गुन्हे-**

| अ.क्र | पोलीस ठाणे | गु.र.क्र. व कलम |
|---|---|---|
| | वालीव | गु.र.क्र. ७५१/२०२३ कलम ३९२,३४ भा.दं.वि.(मुळ गुन्हा) |
| | वालीव | गु.र.क्र. ७५४/२०२३ कलम ३९२,३४ भा.दं.वि. |
| | वालीव | गु.र.क्र. ७५६/२०२३ कलम ३९२,३४ भा.दं.वि. |
| | वालीव | गु.र.क्र. ७५९/२०२३ कलम ३९२, ३४ भा.दं.वि. |
| | वालीव | गु.र.क्र. ७६६/२०२३ कलम ३९२, ३४ भा.दं.वि. |
| | वालीव | गु.र.क्र. ७६७/२०२३ कलम ३९२, ३४ भा.दं.वि. |
| | पेल्हार | गु.र.क्र. ८५०/२०२३ कलम ३९२, ३४ भा.दं.वि. |
| | पेल्हार | गु.र.क्र. ८४१/२०२३ कलम ३९२, ३४ भा.दं.वि. |
| | पेल्हार | गु.र.क्र. ८५२/२०२३ कलम ३८० भा.दं.वि. |

सदरची कामगिरी करणारे वालीव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जयराज रणवरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. जिलानी सय्यद स.पो.नि. सचिन सानप, पो.हवा. मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, सतीश गांगुर्डे, बाळु कुटे, पो.अं. विनायक राऊत, अभिजीत गढरी यांचा **“ सप्टेंबर महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड” क्रमांक-२ देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.



मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना स.पो.नि. श्री. सचिन सानप

६) उत्तन सागरी पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात फिर्यादी नामे श्री.अमय सुशिल पटनायक, वय.५८ वर्षे, व्यवसाय-इस्टेट एजेन्सी यांचे धावगी रोड, रॉयल स्कुलजवळ, एडु कंपाउंड नं.०२, उत्तन, भाईंदर (प.) येथील बंद घराचे खिडकीचे ग्रील तोडून त्यावाटे प्रवेश करुन एल.जी.कंपनीचा टीव्ही, पाण्याचे मीटर, साडया, रोख रक्कम असा एकूण २२,०००/- किंमतीचा मुद्देमाल चोरी गेला म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन उत्तन सागरी पोलीस ठाणे गु.र.नं. ११६/२०२३ भा.दं.वि.सं कलम ४५४, ४५७, ३८० अन्वये दि.२१/०९/२०२३ रोजी गुन्हा दाखल करणेत आलेला होता.

गुन्हा दाखल झालेनंतर पो.स्टे.उत्तन अधिनस्त पथकाचे मार्फतीने गुन्हयाचा तपास सुरु करणेत आला. वेगवेगळया ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासणी करणेत आली. प्राप्त सीसीटीव्ही फुटेजचे विश्लेषण करुन रेकॉर्डवरील संशयित गुन्हेगारांकडे तपासणी सुरू केली. गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. दत्तात्रय सोनवलकर,पो.हवा.उत्तम जाधव, विजेंद्र दिवेकर, साबळे यांनी सापळा रचून आरोपी नामे १)अतुल कंठीराम कांबळे ,वय.२४ वर्षे रा.धावगी डोंगर, उत्तन, भाईंदर पश्चिम, जि.ठाणे २) अकबर तोफाज शेख, वय.२२ वर्षे, रा.धावगी डोंगर, उत्तन, भाईंदर पश्चिम, जि.ठाणे यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे सखोल विचारपूस केली असता त्यांचा सदर गुन्हातील सहभाग निष्पन्न झाल्याने वर नमुद गुन्हयांत सदर आरोपीत यांना दिनांक दि.२२/०९/२०२३ रोजी अटक करण्यात आलेली आहे. अटक आरोपीत यांचेकडे पोलीस कोठडीमध्ये असताना अधिक चौकशी केली असता त्यांचेकडुन उत्तन सागरी पोलीस ठाणे अभिलेखावरील एकुण ५ गुन्हे उघडकीस आलेले आहेत. गुन्हयांमधील एकुण १,२४,६००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करणेत आलेला आहे.

**- उघडकीस आलेले गुन्हे-**

| अ.कं. | गुन्हा रजि नंबर व कलम |
|---|---|
| १ | ११६ /२०२३ भा.दं.वि.सं कलम ४५४,४५७,३८०,३४ प्रमाणे (मुळ गुन्हा ) |
| २ | ११३ / २०२३ भा.दं.वि.सं कलम ३७९,३४ प्रमाणे |
| ३ | ९५/२०२३ भा.दं.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| ४ | ९४/२०२३ भा.दं.वि.सं कलम ४५४ ४५७ ३८० प्रमाणे |
| ५ | ४५/२०२३ भा.दं.वि.सं कलम ४५४ ४५७ ३८० प्रमाणे |

सदरची कामगिरी करणारे उत्तन सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दादाराम करांडे, पोलीस निरीक्षक,श्री.प्रकाश मासाळ (गुन्हे), स.पो.नि. दत्तात्रय सोनवलकर, स.फौ.कवडे, पो.हवा. उत्तम जाधव, मंगेश शिंदे, विजेंद्र दिवेकर, छोटु साबळे, तुषार पाटील, राजेंद्र आसवले, पो.अं.हनुमंत मान यांचा **"सप्टेंबर महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड" क्रमांक-३ देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.



मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना वपोनि. श्री. दादाराम करांडे